महाराष्ट्र पोलीस

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण
पत्ता :- भुजबळ नॉलेज सिटी जवळ, आडगाव,
नाशिक - ४२२००३ - ०२५३-२२००४३४
EMAIL ID :- sp.nashik.r@mahapolice.gov.in

जि.वा.शा. मोहरम सण/347/२०२४ नाशिक ग्रामीण दिनांक १६/०७/२०२४

विषय : - मोहरम सणाचे अनुषंगाने मालेगाव शहरातुन जाणा-या कुसुंबा रोडवरील अवजड वाहतुकीबाबत.

संदर्भ :- १) जिल्हा वाहतुक शाखा ना.ग्रा. जावक क्र.८२४/२०२३/नाशिक ग्रामीण दि. १९/०९/२०२३
२) मा.जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धुळे यांचेकडील क्र/ड/कक्ष/३/पीओएल/कावि/९६३/२०२३ दिनांक २२/०९/२०२३ अन्वये.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये मालेगाव शहराला धुळे जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ ला जोडणारा कुसुंबा-मालेगाव रोड (राष्ट्रीय महामार्ग क्र. ११६ एच) हा मालेगाव शहरातील दाट लोकसंख्या व जास्त रहदारीच्या आयशानगर, रमजानपुरा या भागातुन मालेगाव तालुक्यातील वडगांव, करंजगव्हाण, टिंगरी, दहिदी, डोंगराळे असा धुळे जिल्हयातील कुसुंबा या गावापर्यंत आहे.

सदरचा रस्त्याचे कॉक्रिटीकरण झाले असुन त्यावर कमी टोलटॅक्स आकारला जातो. तसेच महाराष्ट्र गुजरात व राजस्थान या राज्यातुन दळणवळण करणारी वाहने साक्रि-धुळे-मालेगाव या रोडवर जास्त टोल आकारला जात असल्याने सदर रस्त्याचा वापर न करता साक्रि-कुसुंबा-मालेगाव अशा कमी दराच्या टोलनाक्यावरुन व ३० किमी कमी अंतराच्या रस्त्याचा वापर त्यांचा टोल वाचवण्यासाठी व त्यांचे फायदयासाठी करतात. त्यामुळे सदरच्या रस्त्यावर अवजड वाहनांची वाहतुक वाढलेली आहे. कुसुंबा रोडने येणारी अवजड वाहने मालेगाव शहरातील द्याने-रमजानपुरा-आयेशानगर-नवीन बस स्टॅण्ड-मोसमपुल-मनमाड रोडने मनमाड चौफुलीजवळ मुंबई आग्रा महामार्गावर येतात. तसेच गेल्या ब-याच दिवसापासुन छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील कन्नड घाटाचे काम सुरू असल्याने छत्रपती संभाजीनगर व पुढे दक्षिण भारतात जाणारी वाहने कुसुंबारोड मार्गे मालेगाव-मनमाड-येवला-छत्रपती संभाजीनगर या मार्गाने जातात. त्यामुळे कुसुंबा रोडवर अवजड वाहनांची वाहतूक वाढलेली आहे.

मालेगाव पश्चिम व मालेगाव पुर्व भागास जोडणा-या महत्वाच्या मोसमपुलापैकी मोसमपुल क्र. १ पाडुन नविन पुल बनविण्याचे काम सुरू असुन मोसम पुल क्र. २ वरुन येणारी व जाणारी वाहतुक सुरू आहे. कुसुंबा रोडने येणारी अवजड वाहने मोसम पुलावरुन येत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते. तसेच अजवड वाहनांच्या वाहतुकीने सदरच्या कमकुवत पुलास नुकसान पोहचण्याची दाट शक्यता आहे. एकाच पुलावरुन वाहतूक सुरू असल्याने पुलाचे दोन्ही बाजुंनी खडडे पडुन वाहनांची गती मंदावुन लांबच लांब रांगा लागतात. सदय परिस्थितीत मोहरम हा मुस्लीम धर्मीयांच्या सणानिमीत्ताने नागरिक मोठया प्रमाणावर घराबाहेर पडतात. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडेल व त्यामुळे अपघात घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी विक्रम देशमाने पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ब), ३४ अन्वये दि. १७/०७/२०२४ रोजी सकाळी ०६/०० वा. पासुन ते दि. १९/०७/२०२४ रोजीचे सकाळी ०८/०० वा. पावेतो प्रतिबंधात्मक आदेश अंमलात राहिल.

| अ.क्र | प्रतिबंधीत मार्ग | वळविण्यात आलेला मार्ग |
|---|---|---|
| १ | कुसुंबा-धुळे-मालेगाव | १.साक्रिकडून कुसुंबा-मालेगाव (राष्ट्रीय महामार्ग क्र. ११६ एच) रोडवरील अवजड वाहतुक कुसुंबा - धुळे - मालेगाव (राष्ट्रीय महामार्ग क्र. ०३ ) यामार्गे वळविण्यात येत आहे. |

( विक्रम देशमाने )
पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी मालेगाव विभाग मालेगाव
पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी मालेगाव.

प्रत माहितीसाठी,

अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.
अपर पोलीस अधीक्षक, मालेगाव.

प्रसारित करण्यासाठी,

सर्व संपादक.